Read India
An imprint of Pratham Books



# मोठे संकट

हरमिन्दर ओहरी



RGF Pratham SERIES

Original story (*English*) Kato Clever and the Big Trouble by Herminder Ohri
© Rajiv Gandhi Foundation-Pratham Books, 2004

Second Marathi Edition: 2006

Illustrations: Herminder Ohri
Design: Moonis Ijlal
Marathi Translation: Meera Tendolkar

ISBN: 81-8263-081-9


Registered Office:
PRATHAM BOOKS
9, Charles Campbell Road,
Cox Town,
Bangalore 560 005
✆ 080-25801462, 25801463

Regional Offices in
Mumbai ✆ 022-65162526
New Delhi ✆ 011-65684113

Typesetting &
Layout by:
Pratham Books

Printed by:
Repro India Ltd., Mumbai

Published by: Pratham Books
www.prathambooks.org



Some rights reserved. This book is CC-BY-3.0 licensed.
Full terms of use and attribution available at:
http://www.prathambooks.org/cc

# मोठे संकट


लेखन आणि चित्रांकन
हरमिन्दर ओहरी




मराठी रूपांतर
मीरा तेंडोलकर

शहरातील एक छोटया बागेत एक मोठे पिंपळाचे झाड होते. त्या बागेत बरेच छोटे छोटे प्राणी राहत असत. पिंपळाच्या झाडावर खारींचा एक परिवार राहत होता. विकी त्या परिवारातील अतिशहाणा सदस्य होता. विकीचा चुलत भाऊ काटो दूर जंगलातून त्याला भेटायला आला.






एके दिवशी रात्री सगळेजण झोपायच्या तयारीत असताना बाजूच्या मैदानात काहीतरी ठोकले जात असल्याचा आवाज ऐकू आला.



काटो आणि दुसऱ्या खारींनी डोकावून पाहिले की पिवळ्या रंगाचे मोठे यंत्र आणि पिवळया त्रिकोणी टोप्या घातलेली माणसे बागेकडे बोट करून काहीतरी बोलत होती.



बागेच्या समोरील घरे पाडून तिथे कार पार्क (मोटारी उभ्या करण्यासाठी मोकळी जागा) उभारणार होते. त्या घरांत राहणाऱ्या लोकांना दुसरीकडे राहण्याची सोय करून दिली होती. पण बागेतल्या या छोट्या जीवांचा विचार कोण करतो?



पहाटेपहाटे बागेतल्या चिचुंद्रयांनी ती यंत्रे पाहिली होती. चिचुंद्रयांनमध्ये हवा सिंग सगळयात मोठा होता. त्याने गुलाब सिंगला सांगितले आणि त्याने मख्खन सिंगला.





या चिचुंद्र्या लहान असताना त्यांची ही अशी नावे पडली.



हवा सिंग खारींना खबर दिली, खारींनी पक्ष्यांना, पक्ष्यांनी अळयांना आणि अळयांनी फुलपाखरांना. अशा रीतीने बागेत सगळीकडे ही बातमी पसरली. त्यानंतर हा गोंधळ उडाला !

कोणी पळू लागले, कोणी धावू लागले, कोणी उड्या मारू लागले, कोणी हसू-रडू लागले. कसले संकट आहे? काय करावे? कुठे जावे? हा काय प्रकार आहे? कोणाला काहीच सुचेना.



अळया म्हणाल्या, ''चला, पाने गोळा करूया.''

फुलपाखरे म्हणाली, ''अम्हाला फुले हवीत.''



उंदरांना त्यांच्या बिळांची काळजी वाटत होती आणि चिचुंद्रयांनाही आपली बिळे हवी होती. खंरतर सर्व प्राण्यांना अगदी नक्की ठाऊक होते की झाडांशिवाय आणि गवता शिवाय ते जिवंत राहू शकणार नाहीत. ते मऊ जमिनीवर वाढले होते. सिमेंटच्या कडक जमिनीवर राहणे त्यांना संभव नव्हते. रडता-रडता ते म्हणाले, ''आपल्याला आता हे सर्व कसं





काटोचे काका आणि काकी शांतपणे सगळे ऐकत होते. छोटया खारी आपापल्या आईच्या कुशीत दबकून बसल्या होत्या.

काटोने खाकरून आपल्या घसा साफ केला आणि लाजत म्हणाला, ''मी दूर जंगलात राहतो. आपण सर्व तिथेच का नाही येत?''

व्वा ! आता कसं बरं झालं ! सगळीकडे पुन्हा उत्साह संचारला.

''पण कसे?'' अळी पुटपुटली. डोके खाजवत काटो म्हणाला, ''खारींची सुपर फास्ट एक्सप्रेस. खारी, अळ्यांना, फुलपाखरांना, कोळ्यांना आणि साऱ्या किडयांना तिथे घेऊन जाऊ शकते. पक्षी उडून जाऊ शकतात. चिचुंद्रयांची चिचुंद्री एक्सप्रेस चिचुंद्रया, उंदीर आणि सापांना घेऊन जाऊ शकते.''





सगळ्यांनी काटोची पाठ थोपटली. हवा सिंगने धावत जाऊन चिचुंद्री एक्सप्रेसचा ड्रायव्हर श्री. गिन्टू जवळ पोहचले आणि विचारू लागले, ‘‘चिचुंद्री एक्सप्रेस चिचुंद्रयाना दूर जंगलात घेऊन जाईल का?’’

ड्रायव्हर महाशय सुरूवातीला थोडे गडबडले. मग लाजले, अडखळले आणि नंतर बोलले, ‘‘जरूर.’’

हवा सिंगला वाटले, आपण ही जरा आपला मोठेपणा दाखवायला हवा, ‘‘मित्रांनो घाबरायचे कारण नाही. माझ्या पणजोबांच्या भावाच्या आजोबांची चौथ्या काकीच्या मामेभावाची तिसरी पुतणी आणि दूसरा पुतण्या दूर जंगलात राहतात,’’ त्याने दिलासा दिला.





दुसऱ्याच दिवशी सकाळी सकाळी खार एक्सप्रेस आणि चिचुंद्री एक्सप्रेस रवाना झाल्या. झुक झुक झुक आवाज करीत आपल्या प्रवाशांना घेऊन दूर जंगलात तिथल्या झाडांकडे, फुलांकडे, तलावांकडे आणि मऊ जमिनीकडे.



विकी खारीचे कुटुंब एका बागेत राहत होते. काही लोक मोठी यंत्रे घेऊन बागेत झाडे तोडण्यासाठी आली होती. या संकटातून विकी आणि त्यांचे मित्र यांनी स्वत:ला कसे सोडवून घेतले याची ही रंगतदार कहाणी आहे.

*या मालिकेतील इतर पुस्तके*

रडी आणि ढुशी • नावेतील सहल

छुटकू कोळी • सुंदर जग

आमच्या वेगवेळ्या भाषेतील शीर्षकांच्या संपूर्ण माहितीसाठी
**www.prathambooks.org** ला लॉगऑन करा.

प्रथम बुक्स ना-नफा प्रकाशक आहेत जे उत्तम दर्जाची आणि स्वस्त दरात भारतातील विविध भाषेत लहान मुलांसाठी पुस्तके काढतात.

ISBN 81-8263-081-9

9788182630819

Mothe Sankat (Marathi)

Rs. 20.00